**<u>अर्जदारातर्फे साक्षीदार क्रमांक २ याची जबानी सत्यप्रतिज्ञेवर सुरु.</u>**

मोटार अपघात नुकसान भरपाई
अर्ज क्र.१०३/२०२१
जुना M.A.C.P. क्र.१२६/२०१६
आश्वीनी वि. राजु
निशाणी क्रमांक ४० खाली

**<u>गैरअर्जदार क्र.१ तर्फे कोणीही हजर नसल्याने उलटतपास नाही.</u>**

**<u>उलटतपास– गैरअर्जदार क्र.२ तर्फे विधीज्ञ श्री. बी.बी.पांडे यांचेमार्फत सुरु...</u>**

घटना घडली तेव्हा मी माझ्या घरासमोर होतो. घटना ही माझ्या घरापासुन ४–५ कि.मी. अंतरावर घडली. घटना मी प्रत्यक्ष पाहिली नाही. हे खरे आहे की, अपघात कसा घडला, कोण त्या अपघातासाठी जबाबदार होता हे मी प्रत्यक्ष पाहिले नाही. अपघाताची माहिती मला कोणी दिली त्याचे नाव गाव सांगु शकत नाही. ज्या बोलेरोवाल्याने मला सांगीतले त्या बोलेरोचा नंबर मला सांगता येणार नाही. मी स्वतः पोलीस ठाण्यात जावुन खबर दिलेली नाही. बोलेरोवाल्याने मला अपघातासंदर्भात खबर दिली असे मी पोलीस ठाण्यात सांगीतले नाही. हे खरे नाही की, बाळकृष्ण तायडे हे माझ्या ओळखीचे आणि परिचयाचे आहे. हे खरे नाही की, बाळकृष्ण तायडे यांच्या सांगण्यावरुन राजु चौधरी यांच्याशी संगनमत करुन अर्जदाराला मदत व्हावी यासाठी मी खोटी साक्ष देत आहे. हे खरे नाही की, अपघात घडलेला मी पाहीलेला नसल्याने ट्रक क्र.MH06 AQ–5515 मी अपघात झाला असे मी खोटे सांगत आहे.

पोलीसांनी माझा जबाब घेतला होता. त्याची तारीख मला सांगता येणार नाही. हे खरे नाही की, मयताच्या वारसास मदत व्हावी म्हणुन मी खोटा जबाब दिला आहे. हे खरे नाही की, पोलीसांनी कोणतीही चौकशी न करता फिर्याद दाखल केली आहे. हे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास काही नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

SANJAYKUMAR VIJAYKUMAR JADHAV
Digitally signed by SANJAYKUMAR VIJAYKUMAR JADHAV
Date: 2022.10.19 17:17:54 +0530

दिनांक : १९/१०/२०२२                    **(एस.व्ही.जाधव)**
तदर्थ जिल्हा न्यायाधीश–१ तथा
सदस्य मोटार वाहन अपघात प्राधीकरण
मलकापूर.

वाचुन दाखवले बरोबर आहे असे साक्षीदाराने सांगितले. (साक्षीपुरावा केवळ मराठी भाषेत नोंदविण्यात आला.)

SANJAYKUMAR VIJAYKUMAR JADHAV
Digitally signed by SANJAYKUMAR VIJAYKUMAR JADHAV
Date: 2022.10.19 17:17:58 +0530

दिनांक : १९/१०/२०२२                    **(एस.व्ही.जाधव)**
तदर्थ जिल्हा न्यायाधीश–१ तथा
सदस्य मोटार वाहन अपघात प्राधीकरण
मलकापूर.